माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :-सावंत कॉर्नर, जे एस पी एम बिल्डिंगच्या मागे, कात्रज चौक पुणे ४६
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल : kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०५/१६
जावक क्र. :- 3963 दिनांक :- 30/10/18

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.: अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे
मनपा/अपिल/दि.११.१०.१८

१. अपिलकर्ता अनिता अशोक राजेगायकवाड
ए-२२ आदित्य रेसिडेन्सी ४९८ पर्वती पुणे ४११००९.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

अनिता अशोक राजेगायकवाड
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता अनिता अशोक राजेगायकवाड यांचा माहिती अधिकाराचा अर्ज बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडून कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयास दिनांक २०/०८/२०१८ रोजी प्राप्त झाला. अर्जदाराने सहकारनगर कार्यालयाच्या तळमजल्यावरील पार्किंगमधील सुरक्षा रक्षक यांचेकडील नोंद वहीची प्रत मिळणेबाबत अर्ज केला आहे.

जनमाहिती अधिकार तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी ,पुणे महानगरपालिका यांनी अपिलकर्ता यांस माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१)(छ),कलम ८(१)(त्र) विचारात घेवून संदर्भांकित अर्जान्वये मागविणेत आलेली माहिती उपलब्ध करून देणेचे नाकारण्यात येत आहे,असे पत्र जा.क्र.२२२५ दि.२८.०८.१८ अन्वये कळविले असल्याचे सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २०/०८/२०१८ | १९/०९/२०१८ | २८/०८/२०१८ | निरंक | २८/०८/२०१८ |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २७/०९/२०१८ | ०१/१०/२०१८ | नाही | – | ०९/१०/२०१८ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ११/१०/२०१८ रोजी दुपारी ०१.३० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- अनुउपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | सहकारनगर कार्यालयाच्या तळमजल्यावरील पार्किंगमधील सुरक्षा रक्षक यांचेकडील नोंद वहीची प्रत मिळणेबाबत. | माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१)(छ),कलम ८(१)(त्र) विचारात घेवून संदर्भांकित अर्जान्वये मागविणेत आलेली माहिती उपलब्ध करून देणेचे नाकारण्यात येत आहे,असे पत्र जा.क्र. २२२५ दि.२८.०८.१८ अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक यांनी सांगितले. |

## विवेचन

सदर अर्जासंदर्भात अर्जदार यांनी आ.क्र.३६८७ दि.११/१०/२०१८ ने दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले.

अर्जदार यांनी दि.०३/०८/२०१८ रोजी आ.क्र.३२१७ अन्वये बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे माहिती अधिकार अंतर्गत अर्ज दाखल केला.

सदरचा अर्ज बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाने दि.१६/८/२०१८ रोजी जा.क्र.२७६४ अन्वये कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे वर्ग केला.

त्यावर मा.जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक यांनी जा.क्र.२२२५ दि.२८/८/२०१८ अन्वये उत्तर देवून माहिती नाकारली.

या पत्रावर अपिलार्थी यांनी अपिल प्राधिकारी यांचेकडे अपील दाखल केले. त्याची सुनावणी आज दि.११/१०/२०१८ रोजी नेमली होती. मा. राज्यमंत्री महोदय यांचे बैठकीमुळे सदरची सुनावणी दु.०१.३० नंतर घेणेत येईल याबाबतीत मा.जनमाहिती अधिकारी यांनी पूर्वसूचना दिली असता अर्जदार यांचे तर्फे श्री जगदीश राजेगायकवाड यांनी आ.क्र.३६८७ दि.११/१०/२०१८ अन्वये लेखी म्हणणे सादर करून निघून गेले. सदरचे म्हणणे विचारात घेतले. अपिलार्थीने कागदपत्रे बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे पाठवा अशी मागणी केली आहे. सदरची मागणी विचारात घेणेसाठी कोणतेही संयुक्तिक कारण दिसून येत नाही.

## -: आदेश :-

यापुर्वी अपिल प्राधिकारी यांनी निर्णय घेतलेला असल्याने त्यात पुन्हा पुन्हा बदल करण्याची तरतूद कायद्यामध्ये नाही.

सबब जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर कायम करणेत येत आहे. यापूर्वी मा.जनमाहिती अधिकारी व मा.अपील प्राधिकारी यांनी प्रकरणी घेतलेले निर्णय व बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे केलेला यापूर्वीचा पत्रव्यवहार बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयास उपलब्ध करून देणेत येत आहे.

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(नितीन उदास)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः ११.१०.२०१८ ,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२.प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :- १. अपिलकर्ता अनिता अशोक राजेगायकवाड
ए-२२ आदित्य रेसिडेन्सी ४९८ पर्वती पुणे ४११००९.

२. श्री.अशोक महाजन
जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.

३. मा.अपील प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त,
बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका

यांचेकडे पुढील कार्यवाही सादर...